सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
RNI No. - MAHMAR 2023/84526
https://epaper.vidarbhaprajasattak.com
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.३१ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## देशातील पहिले राज्य, सगळेच आमदार झाले सत्ताधारी; विरोधकच उरला नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ गंगटोक सिक्कीम**

सध्या देशात दोन राज्यांच्या विधानसभा निवडणुका आणि १३ राज्यांच्या पोटनिवडणुकांचा काळ सुरु आहे. यापैकी महाराष्ट्र विधानसभा आणि उत्तर प्रदेश पोटनिवडणुकीवर सगळ्यांचे लक्ष आहे. अशातच पूर्वेकडील राज्यात मोठी घडामोड घडली आहे. हे राज्य विधानसभेत विरोधकच नसलेले एकमेव राज्य ठरले आहे.



सिक्कीमध्ये मोठी राजकीय घडामोड घडली आहे. तेथील प्रमुख विरोधी पक्ष सिक्कीम डेमोक्रेटिक फ्रंट (एसडीएफ) संपला आहे. यामुळे सिक्कीम विधानसभा विरोधी पक्षच राहिलेला नाही. सिक्कीममध्ये दोन जागांवर पोटनिवडणूक होत आहे. सोरेंग-चाकुंग आणि नामची-सिंघीथांग या जागांवर एसडीएफने उमेदवार उतरविले होते. परंतू, या उमेदवारांचे अर्ज अयोग्य घोषित करण्यात आले आहेत. १३ नोव्हेंबरला या ठिकाणी मतदान होणार होते. यामुळे सत्ताधारी एसकेएमचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

देशात पहिल्यांदाच विधानसभेत विरोधी पक्ष नाही, असे घडले आहे. प्रेम बहादुर भंडारी आणि डेनियल राय यांचे अर्ज फेटाळण्यात आले आहेत. यामुळे सिक्कीम क्रांतीकारी मोर्चाचे उमेदवार आदित्य गोळे आणि सतीश चंद्र राय हे बिनविरोध निवडले गेले आहेत. मुख्यमंत्री प्रेमसिंह तमांग यांच्या नेतृत्वात एसकेएमकडे आता विधानसभेचे सर्वच्या सर्व ३२ आमदार असणार आहेत.दोन्ही उमेदवारांकडे प्रस्तावकांची अपेक्षित संख्या नव्हती असे अर्ज पडताळणीत समोर आले आहे. यामुळे त्यांचे अर्ज फेटाळण्यात आले आहेत. तर पोबिन हंग सुब्बा यांचाही अर्ज अपूर्ण ॲफिडेविट दिल्याने फेटाळण्यात आल्याचे निवडणूक विभागाच्या सूत्रांनी सांगितले आहे. दरम्यान विरोधी पक्षांनी यावर टीका केली आहे. विरोधी पक्षांनी यावर टीका करताना लोकशाहीवर हल्ला असल्याचे म्हटले आहे. तसेच याविरोधात हायकोर्ट, सुप्रिम कोर्टात जाणार असल्याचेही म्हटले आहे.

## महायुतीतील नेत्यांनी एकनिष्ठचे धडे देऊ नये: बच्चू कडू; नेवासा येथे निर्धार मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नेवासा**

पक्ष फोडून तयार झालेल्या महायुतीच्या नेत्यांनी कार्यकर्त्यांना एकनिष्ठतेचे धडे देणे योग्य नाही. केवळ सत्तेसाठी एकमेकांच्या जागेवर आपापले उमेदवार देत असल्याने जनता हे सहन करणार नाही, अशी टीका तिसऱ्या आघाडीचे नेते आमदार बच्चू कडू यांनी केली.

नेवासा येथे माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी आयोजित केलेल्या निर्धार मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी भाजप तालुकाध्यक्ष भाऊसाहेब फुलारी, शहराध्यक्ष रोहित पवार, शिवसेना शहरप्रमुख बाबा कांगुणे, माजी नगरसेवक सुनील वाघ, कार्यकर्ते उपस्थित होते.



कडू म्हणाले, बाळासाहेब मुरकुटे यांचा सर्व्हे अनुकूल असताना तसेच कार्य दमदार असतानाही भाजपने त्यांचा घात केला. कार्यकर्त्यांनी एकनिष्ठेने राहावे, मात्र नेत्यांनी निष्ठा विकावी हे सगळं विचित्र राजकारण राज्यात चालू आहे. प्रत्यक्षात निष्ठा या जनतेवर ठेवाव्यात. इथला महायुतीचा उमेदवार सगळे पक्ष फिरून भाजपत आला आणि तिकिटासाठी सेनेत गेला अशी टीका कडू यांनी केली.बाळासाहेब मुरकुटे म्हणाले, मतदारसंघात सातत्याने भाजपचे योगदान आहे. परंतु, लोकसभेला शिवसेना उमेदवाराला दिलेले मताधिक्य ही आमची चूक झाली आहे. त्यामुळे शिवसेनेने या मतदारसंघावर दावा केला. त्यामुळे भाजपाचे अस्तित्व संपले.

## पीएम मोदींनी कच्छमध्ये जवानांसोबत साजरी केली दिवाळी, स्वत:च्या हाताने मिठाई खाऊ घातली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१कच्छ**

देशभरात दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर दरवर्षीप्रमाणे या वर्षीही पंतप्रधान नरेंद्र मोदी सैनिकांसोबत दिवाळी साजरी करत आहेत. यावेळी पंतप्रधान मोदी सैनिकांसोबत दिवाळी साजरी करण्यासाठी गुजरातच्या कच्छमध्ये आले आहेत. दिवाळीनिमित्त सैनिकांना भेटल्यानंतर पंतप्रधान मोदींनी स्वत:च्या हाताने त्यांना मिठाई खाऊ घातली आणि त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.



**पंतप्रधान झाल्यानंतर पहिल्यांदाच गुजरातमध्ये**

केवडिया येथे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांना पुष्पांजली अर्पण केल्यानंतर पंतप्रधान मोदी कच्छमध्ये पोहोचले. दरम्यान, पंतप्रधान झाल्यानंतर नरेंद्र मोदी पहिल्यांदाच गुजरातमध्ये सैनिकांसोबत दिवाळी साजरी करत आहेत. यापूर्वी त्यांनी गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी गुजरातच्या सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली होती.

**गेल्यावर्षी हिमाचलमध्ये**

पंतप्रधान मोदींनी गेल्या वर्षी हिमाचल प्रदेशातील लेपचा येथे सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली होती. तर, २०२२ च्या दिवाळीला पीएम मोदी कारगिलमध्ये होते. त्यावेळी त्यांनी १९९९ च्या कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहिली होती. विशेष म्हणजे, पंतप्रधान झाल्यापासून नरेंद्र मोदी सलग ११व्यांदा सैनिकांसोबत दिवाळी साजरी करत आहेत.

### पंतप्रधान मोदींनी आतापर्यंत कुठे-कुठे दिवाळी साजरी केली?

वर्ष २०१४: पंतप्रधान मोदींनी सियाचीनमध्ये सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.
वर्ष २०१५: पाकिस्तान सीमेवर सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.
वर्ष २०१६: हिमाचल प्रदेशात सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.
वर्ष २०१७: बांदीपोरा, जम्मू आणि काश्मीरमध्ये सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.
वर्ष २०१८: उत्तरकाशी, उत्तराखंडमध्ये ITBP सोबत दिवाळी साजरी केली.
वर्ष २०१९: राजौरी, जम्मू आणि काश्मीरमध्ये सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.
वर्ष २०२०: राजस्थानच्या जैसलमेरमध्ये सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.
वर्ष २०२१: जम्मू-काश्मीरच्या नौशेरा सेक्टरमध्ये सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.
वर्ष २०२२: कारगिलमध्ये सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.
वर्ष २०२३: हिमाचल प्रदेशातील लेपचा येथे सैनिकांसोबत दिवाळी साजरी केली.

## ४४ वर्षे निष्ठेने काम केले, पण तिकीट नाकारले काँग्रेस नेते फडणवीसांच्या उपस्थितीत भाजपात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणाला वेग आला आहे. लवकरच सर्व पक्षांचा प्रचाराचा धडका सुरू होणार आहे. महायुती असो किंवा महाविकास आघाडी असो, जवळपास बहुतांश पक्षातील नेते, पदाधिकाऱ्यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज भरले. आता महाविकास आघाडी आणि महायुतीतील नेत्यांकडून बंडखोरांची मनधरणी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ऐन निवडणुकीच्या काळात काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसच्या बड्या नेत्याने पक्षावर टीका करत राजीनामा दिला आहे आणि भाजपात प्रवेश केला आहे.



मुंबईत काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत रवी राजा यांनी भाजपात प्रवेश केला आहे. रवी राजा यांना सायन कोळीवाडा या ठिकाणाहून उमेदवारी हवी होती. मात्र काँग्रेसने गणेश यादव यांना उमेदवारी दिली. त्यामुळे नाराज झालेले रवी राजा यांनी भाजपात प्रवेश केला. रवी राजा यांनी मुंबई महापालिकेत विरोधी पक्षनेतेपद भूषवले. रवी राजा तीन दशकांहून अधिक काळ काँग्रेसमध्ये होते. त्यांच्याबरोबरच बाबू दरेकर ठाकरे गटातील नेत्यानेही भाजपात प्रवेश केला.

काँग्रेसमध्ये तिकीट वाटपात खूप मोठी घाई झाली आहे. वर्षा गायकवाड मुंबई काँग्रेस अध्यक्षा आहेत. त्यांचे तिकीट वाटपात संपूर्ण श्रेय आहे. वर्षा गायकवाड यांचे वडील खासदार होते. त्यानंतर त्या आमदार झाल्या आणि आता खासदार झाल्या. आता त्यांच्या बहिणीला तिकीट दिले आहे. ४४ वर्षे काँग्रेसचे काम केले. काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. पक्ष सोडण्याचे कारण म्हणजे जो पाच वेळा नगरसेवक बनला आहे, जो मुंबई महानगरपालिकेचा विरोधी पक्षनेता होता आणि जेव्हा आमदारकीसाठी उमेदवारी मागतो तेव्हा दिले जात नाही. धारावी विधानसभेत काँग्रेसमध्ये येऊन चार महिने सुद्धा न झालेल्याला तिकीट दिले आहे. जाणूनबुजून एका ज्येष्ठ नेत्याला विधानसभेत डावलले आहे. नाराज होऊन मी हा निर्णय घेतला आहे. आता मी मुंबई भाजपचा उपाध्यक्ष झालो आहे, अशी प्रतिक्रिया रवी राजा यांनी दिली.

दरम्यान, काँग्रेसला कोल्हापूरमध्येही मोठा धक्का बसला आहे. काँग्रेसच्या विद्यमान आमदार जयश्री जाधव यांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला आहे. काँग्रेसकडून त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली होती. तसेच नवीन उमेदवार निवडतानाही त्यांना विश्वासात घेण्यात आले नव्हते, असा आरोप आता त्यांच्या कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. जाधव यांची उपनेतेपदी निवड करण्यात आली आहे.

## अब्दुल सत्तारांच्या अडचणी वाढल्या:निवडणूक शपथपत्रात १६ चुका

### मालमत्तांशी माहितीही लपवली, उमेदवारी रद्द करण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ सिल्लोड**

सिल्लोड विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे अधिकृत उमेदवार अब्दुल सत्तार यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. त्यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या शपथपत्रात गंभीर प्रकारच्या सोळा चुका असल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. तसेच सत्तार यांच्या शपथपत्रात मानमत्तांची, वाहनांची, हिऱ्यांच्या दागिण्यांची खोटी माहिती दिल्याचा आरोप देखील सामाजिक कार्यकर्ते महेश शंकरपल्ली आणि डॉ. अभिषेक हरिदास यांनी केली आहे.



या संदर्भात आपण निवडणूक आयोगाकडे तक्रार देखील दाखल केली असल्याचे शंकरपल्ली यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. सत्तार यांनी शपथपत्रात दाखवलेल्या मालमत्तेचा तपशील आणि प्रत्यक्ष मालमत्ता यामध्ये प्रचंड तफावत आहे. अनेक मालमत्तांचे क्षेत्रफळ हे चुकीचे दाखवण्यात आले आहे. तसेच मालमत्तेवर करण्यात आलेल्या बांधकामाच्या गुंतवणुकीची माहिती देखील दाखवण्यात आली नसल्याचे या आरोपात म्हटले आहे. काही मालमत्ताची माहिती शपथ पत्रातून गायब करण्यात आली आहे. विविध सहकारी संस्थांमध्ये सत्तार त्यांच्याकडे असलेल्या शेअर्सबाबतही खोटी माहिती देण्यात आली असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

**उमेदवारी रद्द करण्याची मागणी**

२०१९ विधानसभा निवडणुकीतही सत्तार यांनी शपथपत्रात अनेक गोष्टी लपवून निवडणूक आयोगाची फसवणूक केली होती. यासंदर्भात देखील सिल्लोड न्यायालयात फौजदारी याचिका दाखल करण्यात आली होती. त्या प्रकरणात देखील न्यायालयाने सातार्‍यांना समन्स बजावले होते. मात्र हे प्रकरण अद्याप सुनावणीसाठी प्रलंबित आहे. असे असताना सत्तारी यांनी पुन्हा एकदा खोटे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे सत्तार यांची उमेदवारी रद्द करण्यात यावी अशी मागणी त्यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे.

## लोकसभेला शब्द देऊनही अजित पवारांनी पुरंदरमध्ये उमेदवार दिला; विजय शिवतारे संतापले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१बारामती**

लोकसभा निवडणुकीत २०१९ च्या विधानसभा निवडणुकीवेळी अजित पवारांनी केलेली टीका लक्षात ठेवत शिवसेनेचे नेते विजय शिवतारे यांनी बारामतीतून निवडणूक लढविण्याची उघड भुमिका घेतली होती. यासाठी त्यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातील विविध ज्येष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी घेऊन पवार विरोधक जोडण्यास सुरुवात केली होती. य़ामुळे अजिच पवारांनी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना मध्यस्थी घालत शिवतारेंचे बंड थांबविले होते. तेव्हा अजित पवारांनी शिवतारेंना विधानसभेवर पाठविण्याचा शब्द दिला होता. परंतू, आता शिवतारेंविरोधातच उमेदवार दिल्याने शिवतारे संतापले आहेत.

अजित पवार यांनी संभाजी झेंडे यांना पुरंदर मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. यामुळे शिवसेनेचे शिवतारे आणि राष्ट्रवादीचे झेंडे अशी महायुतीतच लढत होणार आहे. झेंडे यांनी लोकसभेला सुनेत्रा पवारांना पाडण्याचे काम केल्याला आरोप शिवतारे यांनी केला आहे. अशा व्यक्तीला अजित पवारांनी उमेदवारी दिल्याने शिवतारेंनी संताप व्यक्त केला आहे.



पुरंदर हवेली मतदारसंघातून विजय शिवतारेंना शिंदे शिवसेनेची उमेदवारी मिळाली आहे. तर अजित पवारांनी झेंडेंना उमेदवार केले आहे. दोन्ही उमेदवार त्या त्या पक्षाच्या एबी फॉर्मवर लढणार आहेत. आता पुढील ३ तारखेपर्यंत कोण उमेदवारी माघारी घेतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अशातच झेंडेंनीही आपणच लढणार असल्याचा दावा केला आहे. मला एबी फॉर्म मिळाला आहे. त्यामुळे शिवतारे त्यांच्या पद्धतीने आणि मी माझ्या पद्धतीने लढणार असल्याचे म्हटले आहे. यावर अजित पवारांची ही वैचारिक दिवाळखोरी असल्याची टीका शिवतारे यांनी केली आहे.

संभाजी झेंडेंनी सुनेत्रा पवारांना पाडण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तिन्ही नेत्यांसमोर शब्द दिला होता की पुरंदरचा किल्लेदार विधानसभामध्ये पाठवावे. तरी देखील अजित पवारांनी उमेदवार दिला. बरे, राष्ट्रवादीचा निष्ठावान नेत्याला संधी दिली असती तरी चालले असते. परंतू पत्नीला पाडणाऱ्या नेत्याला उमेदवारी देताना अजित पवारांनी आपला स्वाभिमान कुठे ठेवला, असा सवाल शिवतारे यांनी उपस्थित केला.

संपादकीय ......

# मुहूर्तवाल्यांनी कलाम आठवावे

भारताची लोकशाही आपल्या विविधतेमुळे जगात एक आदर्श मानली जाते. मात्र, या लोकशाहीला अंधश्रद्धेचे ग्रहण लागलेले दिसते. निवडणुकीच्या काळात बहुसंख्य राजकीय पक्ष आणि उमेदवार यशस्वी होण्यासाठी धार्मिक विधी, मुहूर्त, अंकशास्त्र, वास्तुशास्त्र, ग्रह-तार्यांची दशा अशा अनेक अंधश्रद्धांचा आधार घेतात. निवडणूक हा एक सार्वजनिक विश्वासाचा मुद्दा आहे, पण येथे विज्ञानापेक्षा अंधश्रद्धांना अधिक प्राधान्य दिले जात असल्याचे दिसते.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत 'गुरुपुष्यामृत योग' आणि 'सर्वार्थ सिद्धी योग' अशा मुहूर्तावर अनेक उमेदवारांनी अर्ज भरले. यामुळे निवडणुकीत विजय प्राप्त होण्याची शक्यता अधिक असते, असे अनेकांना वाटते. एकीकडे भारतीय राजकारणात जागतिक विचारप्रवाह, आधुनिक तंत्रज्ञान आणि नव्या पद्धतींचा वापर केला जातो, तर दुसरीकडे अजूनही अंधश्रद्धेवर विश्वास कायम आहे. गुरुपुष्यामृत मुहूर्तावर अर्ज दाखल केल्याने मतदारांचा पाठिंबा मिळतो का, हा प्रश्न कधीच विचारला जात नाही.

कारण, लोकप्रतिनिधींच्या या अंधश्रद्धा असे सूचित करतात की, आपले भविष्य आणि यश जणू एका मुहूर्तावरच अवलंबून आहे. जो पाच वर्ष काम करतो त्याला मुहूर्ताची गरज ती काय? जनतेची कामेच केली नसतील तर असले नको ते 'उद्योग' सूचतात. गेल्या काही निवडणुकांचा अनुभव बघता, राजकारणात प्रवेश करण्यापासून विजय मिळवण्यापर्यंतच्या प्रवासात अंधश्रद्धांना एक प्रकारे 'अमूल्य मार्गदर्शन' मानले जाते. काही उमेदवार अर्ज भरताना विशिष्ट रंगाचे कपडे परिधान करतात, काही विशिष्ट नाणं जवळ ठेवतात, तर काहीजण मंदिरात जाऊन प्रसाद घेऊन येतात. त्यातून ही मंडळी किती भयग्रस्त झालेली आहेत हे दिसते.

यामागील धारणा अशी की, अशा अंधश्रद्धांच्या आधाराने त्यांचे 'नशीब' उजळते. या प्रथेने मतदारांवर होणारा परिणाम, उमेदवारांची गुणवत्ता, निवडणुकीच्या मुद्यांचा विचार अशा गोष्टी बाजूला राहतात. आता तर एक नवीनच फॅड निवडणुकीच्या बाजारात आले आहे. काय तर म्हणे नऊचा आकडा जुळवण्यासाठी पक्षांच्या नेत्यांचा आग्रह असतो. जसे भाजपने महाराष्ट्रातल्या पहिल्या यादीत ९९ जणांना स्थान दिले.

याचा शुभ आकडा नऊ येतो. मनसे, शिवसेना आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीने आपल्या प्रत्येकी ४५ उमेदवारांची यादी जाहीर केली. कारण ४+५ = ९ असा आकडा यातून साधला जातो, ज्याला शुभ असल्याचे मानले जाते. हा विचार केवळ आणि केवळ भारतीय राजकारणातच दिसतो, ज्याचे जगभरात हसू होते. राजकारणातील हा निर्बुद्धपणा समाजातही सहजपणे स्वीकारला जातो, याचे नवल वाटते.

अशी विचारहीन कृती बघून प्रश्न असा पडतो की, उमेदवारांना खरंच मतदारांच्या प्रश्नांची जाणीव आहे का? की त्यांचा विजय केवळ ग्रह-तार्यांवर, शुभ दिवसांवर आणि गणिती आकड्यांवर अवलंबून आहे? दुसरीकडे आपले मुख्यमंत्री महोदय रोजचे योग बघितल्याशिवाय दिनक्रम ठरवत नाही, म्हणे. धार्मिक विधींना तर ते कमालीचे महत्त्व देतात. शिवसेनेतून बंडखोरी केल्यानंतर त्यांनी गुवाहाटीमधील कामाख्या देवीचे मंदिर गाठले होते. महाराष्ट्रात मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी आपल्या सर्व आमदारांसह पुन्हा कामाख्या देवीचे दर्शन घेतले होते.

# कर्मचाऱ्यांसाठी निवडणुकीचे काम नावडते डयुटी रद्द करण्यासाठी ८२० अर्ज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

२० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीसाठी राज्यातील विविध सरकारी विभागातील कर्मचाऱ्यांना निवडणुकीच्या कामासाठी नियुक्ती करण्यात येत आहे. मात्र निवडणुकीचे काम करण्यास उत्सुक नसलेल्या कर्मचाऱ्यांकडून विविध कारणे दाखवून ड्युटी रद्द करण्यासाठी अर्ज केले जात आहेत. काहींना हृदयविकाराचा त्रास, उच्च रक्तदाब, मधुमेह शरीरातील विविध अंग दुखण्याचे आजार आहेत. ड्युटी रद्द करण्यासाठी जिल्ह्यातील ८२० कर्मचाऱ्यांनी जिल्हा प्रशासनाकडे धाव घेतली आहे. याबाबतचे विनंती अर्ज निवडणूक विभागाकडे प्राप्त झाले. या अर्जाची पडताळणी करूनच कर्मचाऱ्यांचे निवडणुकीचे काम रद्द होणार की - नाही हे ठरणार आहे. ड्युटी रद्द करण्यासाठी आजार तसेच अन्य कौटुंबिक कारणे सांगण्यात आली आहेत.



धामणगाव रेल्वे, बडनेरा, अमरावती, तिवसा, दर्यापूर, मेळघाट, अचलपूर आणि मोर्शी या आठ विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ ला विधानसभानिहाय मतमोजणी होणार आहे. मतमोजणी आणि मतदान केंद्रावर कर्मचाऱ्यांची गरज मोठ्या प्रमाणात असल्याने आठही मतदारसंघात २,७०८ केंद्रांवर १२ हजार ८७४ कर्मचाऱ्यांची गरज भासणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाकडून आतापर्यंत २२ हजार ८०८ कर्मचाऱ्यांची नोंदणी करत त्यांना आदेश देखील जारी केले आहे. यामध्ये मतदान केंद्राध्यक्षांसह प्रथम मतदान अधिकारी व अन्य मतदान अधिकारी या कर्मचाऱ्यांचा समावेश असणार आहे. या सर्व कर्मचाऱ्यांचे शनिवार आणि रविवारी पहिले प्रशिक्षण पार पडले. दरम्यान आजार व इतर कौटुंबिक कारणांमुळे यातील सुमारे ८२० कर्मचाऱ्यांनी मात्र कर्तव्य बजावण्याला नकार दिला आहे. विनंती अर्ज घेऊन शेकडो कर्मचाऱ्यांची जिल्हाधिकारी कार्यालयात गर्दी उसळली होती. ८२० कर्मचाऱ्यांचे अर्ज जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झालेत. यामध्ये २८० केंद्राध्यक्ष, १८९ प्रथम मतदान अधिकारी व ३५० इतर मतदान अधिकारी यांचा समावेश आहे.

निवडणुकीचे काम रद्द करण्यासाठी कर्मचारी वेगवेगळी कारणे सांगतात. त्यामध्ये, चालताना धाप लागते, अतिश्रमाने चक्कर येते, हृदयाची शस्त्रक्रिया झालीय, उच्च रक्तदाब आहे, वयस्कर आई-वडिलांची जबाबदारी आहे अशी अनेक कारणे सांगून सरकारी खात्यातील कर्मचारी व अधिकारी निवडणुकीची कामे टाळण्यासाठी प्रयत्न करत आहेत. आपली ड्युटी रद्द व्हावी याकरता वशिले लावले जात आहेत. निवडणुकीचे काम रद्द होऊ शकते, मात्र दुर्धर आजार किंवा अन्य गंभीर कारणांसाठी पुरावा देणे गरजेचे आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# कागदी लिंबाला चांगला बाजारभाव मिळण्यासाठी कोणता बहार धरावा वाचा सविस्तर

**दि.३१ विदर्भ प्रजासत्ताक**

कागदी लिंबूमध्ये तीन प्रकारचे बहार पहावयास मिळतात. जून-जुलैमध्ये येणाऱ्या बहारास आपण मृग, ऑक्टोबर- नोव्हेंबर मध्ये येणाऱ्या बहारास हस्तबहार व जानेवारी-फेब्रुवारीमध्ये येणाऱ्या बहारास आपण आंबिया बहार म्हणतो.

कागदी लिंबाची फळे तयार होण्यास साधारणपणे ४.५ ते ५ महिन्याचा कालावधी लागतो. कागदी लिंबात विशिष्ट बहार घेता येत असले तरी ते आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत नाही. एखादा विशिष्ट बहार घेण्यासाठी ताण दिला तर, त्यामुळे अगोदरच्या बहाराची फळे अपक्व स्थितीतच गळून जाण्याचा धोका संभवतो.

बहार घेतांना पाण्याची उपलब्धता, बहाराची फळे बाजारात येण्याचा हंगाम आणि मिळणारे बाजारभाव याचा प्रामुख्याने विचार करावा. हस्त बहाराची फुले ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात येतात.

हा बहार पावसाळा संपताच 'चित्रा' या नक्षत्रामध्ये तापणारे ऊन, होणारा उकाडा (ऑक्टोबरचे अधिक तापमान) यामुळे झाडाच्या वाढीवर परिणाम होवून काही कालावधीकरीता झाडाची वाढ थांबते, नंतर हिवाळ्यात थंडीला सुरूवात झाली की, कागदी लिंबूच्या झाडावर नवीन नवती सोबत फुले

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

दिसू लागतात. या बहाराची फळे एप्रिल-मे महिन्यात काढणीस येतात.कागदी लिंबाला उन्हाळ्यात चांगला भाव मिळतो. म्हणून हा बहार घेणे व्यवसायीक दृष्टीकोनातून जास्त फायदेशिर ठरते. त्यामुळे बागायतदारांचा कल हस्तबहार घेण्याकडे आहे. हा बहार फायदेशीर असला तरी तो सहज घेता येत नाही.कारण लिंबूवर्गीय फळझाडांमध्ये साधारणतः आंबिया बहार ६० टक्के, मृग बहार ३० टक्के तर हस्त बहार फक्त १० टक्केच येतो. म्हणून हस्त बहार घेण्याकरीता शास्त्रीय दृष्टीकोन ठेवून बागेची मशागत, खत व्यवस्थापन, ओलित




व्यवस्थापन आणि संजिवकाचा उपयोग करून हमखास बहाराची फुले आणणे आणि उत्पादनात वाढ करणे आवश्यक आहे.

हस्त बहार घेण्याकरीता लिंबू झाडावर मृग बहाराची फळे नसावीत याकरीता लिंबू झाडावर मृग बहार न येण्यासाठी सवय लावणे गरजेचे आहे. त्यामुळे मृग बहाराची फळधारणा होणार नाही किंवा कमी प्रमाणात येईल व नंतर हस्त बहार नियमित येत राहील.

हस्त बहार घेण्यासाठी उपाययोजना

मृग बहाराची फुलधारणा टाळण्यासाठी झाडाला १ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबरच्या दरम्यान ताण द्यावा. ताणामुळे झाडाला विश्रांती मिळते, झाडे सुप्त अवस्थेत जातात, झाडाची कायीक वाढ थांबते, मंदावते आणि कर्ब-नत्र गुणोत्तराचा योग्य प्रमाणात संचय होतो.एखादा विशिष्ट बहार घेण्यासाठी ताण दिला तर, त्यामुळे अगोदरच्या बहाराची फळे अपक्व स्थितीतच गळून जाण्याचा धोका संभवतो.

जिब्रेलीक ॲसिड ५० पी.पी.एम. (५ ग्रॅम १०० टक्के शुध्द जिब्रलिक घटक १०० लिटर पाण्यामध्ये) या संजिवकाची जून महिन्यामध्ये फवारणी करावी, अपेक्षीत परिणाम साधण्यासाठी फुलधारणेच्या १५ ते २० दिवस अगोदर फवारणी करणे आवश्यक आहे.

ताणाचे कालावधीत पाऊस येत असल्यास बऱ्याच वेळा ताण योग्य प्रकारे बसत नाही. यासाठी झाडे ताणावर सोडतांना सायकोसील १००० पी.पी.एम. (१ ग्रॅम १०० टक्के शुध्द घटक क्लोरोम्केकेट क्लोराईड १ लिटर पाण्यात किंवा २ मि.ली. लिहोसीन १ लिटर पाण्यात) या संजिवकाची सप्टेंबर महिन्यामध्ये फवारणी करावी.

आवश्यकता असल्यास १५ दिवसांनी हीच फवारणी पुन्हा करावी.

सायकोसिल हे वाढ मंदावक, जिब्रेलीन तथा इतर संजिवक विरोधात कार्य करते. त्यामुळे झाडांच्या आंतरीक गतिविधींचा दर कमी होऊन झाडे सुप्त अवस्थेत जातात, झाडाची कायिक वाढ थांबते, मंदावते आणि कर्ब-नत्र गुणोत्तराचा योग्य प्रमाणात संचय होतो.

ताण दिल्यानंतर बहार येण्याकरीता व फुलगळ रोखण्यासाठी अन्नद्रव्यांची त्वरीत उपलब्धता होणे आवश्यक असते. त्यासाठी पोटॅशियम नायट्रेट १ टक्का (१० ग्रॅम १ लिटर पाण्यात) द्रावणाची ऑक्टोबर महिन्यात पाण्याचा ताण तोडताच फवारणी करावी. यामुळे नत्र व पालाशची आवश्यकता त्वरीत पूर्ण करता येते.




# रिकाम्या पोटी लसूण खाण्याचे फायदे

**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक**

लसूण हा असा मसाल्याचा पदार्थ आहे जो प्रत्येकाच्या घरी दररोज वापरला जातो. लसूणमध्ये असलेल्या औषधी गुणधर्मामुळे आपल्या आरोग्याला भरपूर फायदे मिळतात. यातील पोषक घटकांमुळे कित्येक आजारांपासून आपलं संरक्षण होण्यास मदत मिळते. आयुर्वेदामध्ये लसूण हे एक औषध म्हणून ओळखलं. लसूणमध्ये अँटी ऑक्सिडेंट, अँटी-बॅक्टेरिअल, अँटी - फंगल आणि अँटी - व्हायरल हे गुणधर्म आहेत. अशा परिस्थितीत जर तुम्ही दररोज रिकाम्या पोटी लसणाच्या काही पाकळ्या खाल्लूया तर तुम्हाला त्याचे अनेक फायदे मिळू शकतात.

**वजनावर नियंत्रण**

तुम्हाला जर तुमचे वजन नियंत्रणात ठेवायचे असेल तर तुम्ही दररोज लसूणच्या काही पाकळ्या खाल्लूया पाहिजेत. कारण लसणात काही असे घटक असतात जे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करते. त्यामुळे दररोज लसूणच्या पाकळ्या खाव्यात.

**मधुमेहींसाठी ठरतो गुणकारी**

नियमितपणे लसूण खाल्लूयाने रक्तातील इन्सुलिनची पातळी वाढते. त्यामुळे साखर नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. त्यामुळे मधुमेहींनीही डॉक्टरांच्या सल्लूयानुसार दररोज कच्च्या किंवा भाजीतून व इतर पदार्थांच्या माध्यमातून लसणाचे सेवन अवश्य करावे.

**कॅन्सरपासून संरक्षण**

लसूणमध्ये एंटी ऑक्सिडेंट, एंटी इंफ्लेमेटरी आणि एंटी कार्सिनोजेनिक हे घटक आढळतात. त्यामुळे दररोज सकाळी उपाशी पोटी लसूण खाल्ला पाहिजे. यामुळे कॅन्सरचा धोका टळतो.

हृदयाचे आरोग्य

लसूण केवळ रक्तदाबच नव्हे तर खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करून आणि रक्तवाहिन्या कडक होण्यापासून रोखून हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करते. तज्ज्ञांच्या मते, सकाळी रिकाम्या पोटी लसूण खाल्लूयाने रक्त घट्ट होण्यापासून रोखले जाते आणि



रक्तातील कोलेस्टेरॉलची पातळीही कमी राहते.

**इम्युनिटी बूस्ट करते**

कच्चा लसूण अँटीऑक्सिडंट्स आणि सल्फरयुक्त संयुगे समृद्ध असल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवण्यास मदत करतो. कच्च्या लसणाच्या नियमित सेवनाने इन्फेक्शन आणि आजार टाळता येतात.

**पचनसंस्था मजबूत ठेवते**

जर तुम्हाला पचनाच्या संबंधित समस्या असेल, तर रोज सकाळी रिकाम्या पोटी लसूणच्या पाकळ्या खाव्यात. यासोबत तुम्ही पचनाच्या समस्यांपासूनही सुरक्षित राहता. लसणात अँटी-मायक्रोबियल गुणधर्म आढळतात जे तुम्हाला गॅस, सिडिटी, पोटदुखी यांसारख्या समस्यांपासून वाचवतात.

जर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी लसणाच्या दोन ते तीन पाकळ्या खाल्लूया तर तुम्हाला त्याचे अनेक फायदे मिळू शकतात.

# सोयाबीन विक्रीसाठी आणण्यापूर्वी तपासून आणण्याचे जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

शासनमान्य हमीभाव खरेदी केंद्रावर सोयाबीन विक्रीसाठी आणण्यापूर्वी व्यवस्थित वाळवून त्यामधील आद्रतेचे प्रमाण १२ टक्केपेक्षा कमी असल्याची व एफएक्यू दर्जाचे सोयाबीन असल्याची खात्री करावी. त्यासाठी शेतकऱ्यांनी सोयाबीनचे नमुने खरेदी केंद्रावर आणून त्यातील आर्द्रता तपासावी व ती १२ टक्केपेक्षा कमी असल्यासच सोयाबीन खरेदी केंद्रावर विक्रीसाठी आणावे. जेणेकरून जास्त आर्द्रतेमुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन परत न्यावे लागणार नाही, असे आवाहन जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांनी केले आहे.

# दिवाळीत घरी लक्ष्मी पूजन कसे करावे ? सोपी पद्धत जाणून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

यदा दिवाळीचा सण १ नोव्हेंबर२०२४ ला साजरा केला जाणार आहे. या सणामध्ये सगळे जण लक्ष्मी आणि गणपतीची पूजा करतात. अस म्हणतात की, जो माणूस दिवाळीत भक्तिभावाने पूजा करतो त्याला आयुष्यात कोणत्याही गोष्टीची उणीव भासत नाही पण दिवाळीत योग्य पद्धतीने पूजा करण आवश्यक आहे दिवाळीत पूजा कशी करावी, ते जाणून घेऊयात.

**दिवाळीत लक्ष्मी पूजन करण्याची पद्धत**

दिवाळीत लक्ष्मी पूजनाआधी घराची नीट साफसफाई करून घ्या. पूजेच्या ठिकाणी पाट अभवा चौरंग ठेवा आणि त्यावर लाल किंवा पिवळ कापड टाका.




कापडावर लक्ष्मी गणेश मूर्तीची स्थापना करा गणपतीच्या उजव्या हाताला लक्ष्मीची मूर्ती ठेवा. या मूर्तीजवळ राम दरबार, कुबेर, सरस्वतीची मूर्ती अथवा प्रतिमा आणि कलश स्थापन करा. आणि गणपतीच ध्यान करा गं गणपतये नम हा मंत्र म्हणा. पूजेच्या ठिकाणी सगळ्यात आधी मूर्ती आणि पूजेच्या साहित्यावर गंगाजल शिंपडा त्यानतर हातात लाल किंवा पिवळं फूल घ्या. गणपतीला टिका लावून दूर्वा आणि प्रसाद अर्पण करा त्यानंतर लक्ष्मीची पूजा करा लक्ष्मीला कुक्कू लावून श्री सुक्त म्हणा याच पद्धतीने धन कुबेर, राम दरबार आणि सरस्वतीची पूजा करा. काही लोक दिवाळीत काली मातेची पूजा करतात. पूजा झाल्यानतर लक्ष्मी आणि गणपतीची आरती करा. यानंतर घरातल्या कोपऱ्यांमध्ये पणत्या किंवा दिवे लावा देव्हाऱ्यात एक तुपाचा आणि एक तेलाचा मोठा दिवा लावा तेलाचा दिवा संपूर्ण रात्रभर लावून ठेवा.



# परवानगी, तक्रारींचा निपटारा तातडीने करावा : निवडणूक निरीक्षकांच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

निवडणुकीतील प्रत्येक उमेदवारांना सहकार्य करावे. त्यांना प्रचारासाठी आवश्यक असलेली परवानगी तातडीने देण्याची व्यवस्था करण्यात यावी. यासाठी एक खिडकी कार्यान्वित करण्यात यावी. परवानगी, तसेच तक्रारींचा निपटारा तातडीने करावा, अशा सूचना निवडणूक निरीक्षकांनी दिल्या.



जिल्हाधिकारी कार्यालयात विधानसभा निवडणुकीसाठी दाखल झालेल्या चारही सामान्य निरीक्षकांनी आज आढावा घेतला. यावेळी निवडणूक सामान्य निरीक्षक रवि रंजन कुमार विक्रम, श्याम लाल पुनिया, लक्ष्मीशा जी, बिधानचंद्र चौधरी यांच्यासह जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महोपात्रा, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा पोलिस अधीक्षक विशाल आनंद, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे आदी उपस्थित होते.

निवडणूक निरीक्षक यांनी मतदानासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधा निर्माण करण्यात याव्यात. प्रामुख्याने उमेदवारांना देण्यात येणाऱ्या विविध परवानगीसाठी विशेष व्यवस्था करण्यात यावी. उमेदवारांना प्रचाराची परवानगी सुलभरित्या मिळाल्यास ते खर्चही व्यवस्थित देतील. मतदानासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, यासाठी कमी मतदान असलेल्या आणि शहरी भागामध्ये जनजागृतीचे अभियान राबविण्यात यावे, अशा सूचना केल्यात.

बैठकीत जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघाची माहिती दिली. प्रामुख्याने मेळघाट विधानसभा मतदारसंघ हा जंगल आणि रिमोट असल्याने यावर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. येथील सर्व मतदान केंद्र पर्यायी व्यवस्थेने संपर्कात राहतील, याची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मतदार यादी अंतिम करण्यात येत असून नव्याने गेल्या कालावधीत एक लाखाहून अधिक नवीन मतदारांची नोंदणी करण्यात आली आहे. मतदानासाठी पुरेशा प्रमाणात ईव्हीएम मशीन्स उपलब्ध असून त्या विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आल्या आहे.

मतदानावरील बहिष्काराची अद्याप कोणतीही माहिती उपलब्ध नाही. परंतु जिल्हा प्रशासन यावर पूर्ण लक्ष ठेऊन आहे. तसेच लोकसभा निवडणुकीत कमी मतदान झालेल्या भागात स्वीपचे उपक्रम राबविण्यात येत आहे. गेल्या लोकसभेच्या मतदानात तीन टक्के वाढ झाली आहे. नियंत्रण कक्ष, स्ट्रॉंगरूम सुसज्ज आहे. तसेच नागरिकांच्या तक्रारी आणि परवानगीसाठी जिल्हास्तरावर सुविधा निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे उमेदवारांना कोणताही त्रास होणार नाही. निवडणूक निरीक्षकांची माहिती आणि संपर्क क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिक त्यांच्या समस्यांबद्दल थेट संपर्क साधू शकतील, असेही श्री. कटियार यांनी सांगितले.

# अमरावती व बडनेरा विधानसभा मतदार संघातील उमेदवाराच्या खर्च तपासणीचे वेळापत्रक जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने खर्च निरीक्षक यांच्याशी चर्चा करून प्रत्येक उमेदवाराची खर्च नोंदवही तपासणीसाठी वेळापत्रक तयार करण्यात येत आहे. बडनेरा विधानसभा मतदारसंघातील सर्व उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन ३७ –बडनेरा विधानसभा, मतदार संघाचे उपजिल्हाधिकारी महसूल तथा निवडणूक निर्णय अधिकारी विवेक जाधव यांनी केले आहे.पहिली तपासणी दि. ७ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत, दुसरी तपासणी दि. ११ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत, तिसरी तपासणी दि. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील. तपासणीचे ठिकाण निवडणूक खर्च तपासणी कक्ष,उपविभागीय अधिकारी कार्यालय, जुनी अमरावती तहसिल कार्यालय, अमरावती येथे राहील.




जर उपरोक्त दिनांकाला सर्व उमेदवारांच्या लेख्यांची तपासणी वेळेअभावी पूर्ण होऊ शकली नाही तर उर्वरित उमेदवारांच्या लेख्याची तपासणी त्याच ठिकाणी दुसऱ्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत पूर्ण करण्यात येईल.

बडनेरा विधासभा मतदारसंघ, विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मधील सर्व उमेदवारांनी आपले खर्चाचे लेखे आवश्यक त्या सर्व अभिलेख्यासह तपासणीसाठी स्वत: किंवा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत उपलब्ध करून द्यावे. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, तपासणी अनिवार्य असल्याने कोणत्याही उमेदवाराने किंवा प्राधिकृत प्रतिनिधीने अनुपस्थित राहू नये, अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

# आकाशकंदीलावर मतदान जनजागृती
## धामणगाव विधानसभा क्षेत्रातील स्वीपचा उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१चांदुर रेल्व**

दिनांक २० नोव्हेंबर रोजी राज्यात सर्वत्र एकच वेळी विधानसभा निवडणूक होऊ घातली आहे. या निवडणुकी दरम्यान धामणगाव रेल्वे विधानसभा क्षेत्रातील मतदानटक्केवारी व मतदान जनजागृतीसाठी स्वीप कक्षद्वारा विविध नावीन्यपूर्ण उपक्रमाची आखणी करण्यात आली. सध्या चांदूर रेल्वे, धामणगाव रेल्वे व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील विविध शाळांनी आकाशकंदील वर निवडणूक संदेश देत दिवाळी उत्सवसह निवडणूक उत्सव साजरा करत आहे.



जिल्हा परिषद व खाजगी शाळांतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी संकलित चाचणी १ नंतर प्रथम सत्राच्या अखेरच्या दिवशी शाळांमध्ये दीपावली उपक्रमाचे आयोजन केले होते.यात रांगोळी रेखाटन, पणती सजावट, फलक सजावट, आकाश कंदील निर्मिती आदी विविधांगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. दीपावली उत्सवासह निवडणूक उत्सव असल्याने याद्वारे निवडणुकीबाबत जनजागृती करण्याच्या सूचना धामणगाव विधानसभा स्वीप पथक प्रमुख तथा गटशिक्षणाधिकारी संदीप बोडखे यांनी यंत्रणेला दिल्या. तीनही तालुक्यातील विविध जिल्हा परिषद तथा खाजगी शाळांवर स्वीप अंतर्गत विविधांगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेच्या आदर्श शिक्षिका वैशाली धाकुलकर यांच्या 'पहिला दिवा ' थोर पुरुषांच्या प्रतिमा समोर प्रज्वलित करून वैचारिक वेशभूषा साकारून विचारांचा दीपोत्सव साजरा केला. यासह चांदूर रेल्वे तालुक्यातील शिरजगाव कोरडे, निंभा, , मांजरखेड कसबा, राजुरा, नांदगावमधील लोणी, शेलु नटवा, येवती, लोणी, येवती, वेणी गणेशपुर, पापड, लोहगाव , मांजरी म्हसला, दाभा, धामणगाव तालुक्यातील निंबोली तरोडा, शेंदूरजना, गुंजी, मंगरूळ, तिवरा, चिंचोली, आदीसह अन्य विविध शाळांमध्ये निवडणूक स्पेशल दीपावली साजरी करण्यात आली.स्वीप कक्षात रवींद्र दिवाण, श्रीनाथ वानखडे, सुधीर केने, प्रफुल्ल नांदणे,नितीन धोटे, आर आर पठाण आदी परिश्रम घेत आहे.

जनजागृती महत्वाची : संदीप बोडखेदिवाळीचा उत्सव असल्याने या आनंदपर्वात निवडणूक कार्यात दुर्लक्ष होऊ नये व निवडणूक कार्याचा ताण येऊ म्हणून दीपावली आनंदोत्सव माध्यमातून निवडणूक जनजागृती करण्याचे ठरविले आहे. स्वीप कक्ष मार्फत २० तारखेपर्यंत नावीन्यपूर्ण माध्यमातून जनजागृती करणार असल्याचे धामणगाव विधानसभा क्षेत्राचे स्वीप पथक प्रमुख संदीप बोडखे यांनी सांगितले.

कलाशिक्षक माळोदे यांची कल्पकतासंत गाडगेबाबा विद्यालय मांजरखेड कसबा येथील कला शिक्षक जगदीश माळोदे यांनी मतदान जनजागृती करणारा अनोखा आकाश कंदील बनवत स्वीप कक्षाला भेट दिला. जास्तीत जास्त लोकांनी मतदान करण्यासाठी आकाश कंदील मार्फत जनजागृती करण्याची कल्पना सुचली असल्याचे श्री माळोदे सांगतात.

# जिल्हा स्वीप कक्ष व फटाका असोसिएशनमार्फत मतदार जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

जिल्हा स्वीप कक्ष व फटाका असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायन्सकोर मैदानावर मतदान जनजागृती उपक्रम नुकताच राबविण्यात आला. तसेच जिंगल्सव्दारे मतदान जनजागृती करण्यात आली. फटाका खरेदी करणाऱ्या ग्राहकांना यावेळी खरेदीत विशेष सुट मिळणार आहे.उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, सामान्य प्रशासन अधिकारी संजय राठी,प्रशासन अधिकारी राहुल पवार, चिल्लर फटाका विक्रेते सचिव राजाभाऊ उंबरकर, जिल्हा स्वीप कक्षाचे ज्ञानेश्वर घाटे, संजय राठी, नितिन माहोरे, श्रीकांत मेश्राम, हेमंतकुमार यावले, राजेश सावरकर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मतदारांना मतदानाची शपथ देण्यात आली.जिल्हा स्वीप कक्षाव्दारे आगामी काळात विविध जनजागृती कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये जिल्हा स्तरावर सर्व शासकीय यंत्रणा, सर्व सामाजिक, व्यापारी, औद्योगीक, शैक्षणिक संघटना इत्यादीच्या सहभागाने व महानगर पालिका तथा क्रीडा विभागाच्या सहकार्याने जवळपास ५० हजार नागरिकांची मतदान जनजागृती रॅली आयोजित करण्यात येणार आहे. सर्व विधानसभा मतदार संघाअंतर्गत मतदान जनजागृती संदर्भात तालुका स्वीप नोडल अधिकारी व चमूमार्फत विविध उपक्रम, मतदान जनजागृती उपक्रम, महिला व बाल कल्याण विभाग, आरोग्य व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा वर्कर व बचत गटातील महिला यांचा पिंक फोर्स तयार करुन गृह भेटीव्दारे महिला मतदारांमध्ये जनजागृती करणे या बाबींचा समावेश आहे.




# संशयास्पद बँकीग व्यवहाराची माहिती तातडीने सादर करण्याबाबत खर्च निरीक्षकांचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ ची अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघात दिनांक २० नोव्हेंबर२०२४ रोजी निवडणूक होणार असून निवडणुका शांततापूर्ण, भयमुक्त व पारदर्शकरित्या पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहिता लागू केलेली आहे.निवडणुक काळातील संशयास्पद बँकीग व्यवहाराची माहिती खर्च निरीक्षक यांना उपलब्ध करुन देण्याबाबत अग्रणी बँक, सर्व शासकीय व खाजगी बँक तसेच सह निबंधक, सहकारी पतसंस्था, अमरावती यांची सभा खर्च निरीक्षक वेंकन्ना तेजावथ यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच आयोजित करण्यात आली. या सभेत उपस्थित सर्व बँक अधिकारी व सह निबंधक यांना निवडणुक आयोगाने निर्देशीत केल्याप्रमाणे सर्व संशयास्पद व्यवहारांची माहिती विनाविलंब सादर करण्याची सूचना देण्यात आल्या.

नोडल अधिकारी विजय देशमुख, सहायक नोडल अधिकारी दिनेश मेतकर, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अतुल खानजोडे तसेच विविध बँकेचे प्रतिनिधी, सहकारी पतसंस्थांचे सह निबंधक आदी यावेळी उपस्थित होते.

# नेत्रहिन, दिव्यांग आणि मतिमंद यांच्या सोबत दिवाळी साजरी करणार रवी राणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

अमरावती. भाजप,शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले, पिरिपा कवाडे, लहूजी शक्ती सेना, शेतकरी संघटना महायुतीचे युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा दरवर्षी प्रमाणे यंदाही नेत्रहिन, दिव्यांग आणि मतिमंद यांच्या सोबत दिवाळी साजरी करणार आहे. जनतेच्या हक्काचे



एकमेव ठिकाण गंगा सावित्री येथे सोमवारी १ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता दिवाळी साजरी करणार आहे. मागील कित्येक वर्षांपासून रवी राणा सर्वात आधी नेत्रहिन, दिव्यांग आणि मतिमंद यांच्या सोबत दिवाळी साजरी करतात. हे संपूर्ण जिल्ह्यात माहीत आहे. फक्त कुटुंबा पर्यंत मर्यादित कोणताही सण आणि उत्सव रवी राणा यांनी साजरा केला नाही. हे विशेष.

# तृतीयपंथीयाचे विधानसभा निवडणूकीच्या रिंगणात पहिलं 'पाऊल'; रावेर मतदारसंघातून उमेदवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१जळगाव**

तृतीयपंथी हक्क अधिकार समितीच्या माध्यमातून चर्चेत असलेल्या फैजपूर (ता. यावल) येथील शमिभा भानुदास पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात पाऊल टाकले आहे. वंचित बहुजन आघाडीने त्यांना उमेदवारी दिली असून तृतीयपंथी म्हणून विधानसभेसाठी राज्यातून पहिल्याच आणि एकमेव अशा त्या उमेदवार आहेत.विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले उमेदवार प्रचारात लागले आहेत. त्यानुसार जळगाव जिल्ह्यातील रावेर विधानसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीने शमिभा यांना उमेदवारी दिल्याने त्यांनी देखील आपल्या प्रचाराला सुरवात केली आहे. ३९ वर्षीय शमिभा या एम.ए. (मराठी) शिक्षित असून कवी ग्रेस यांच्या साहित्यावर त्या पीएच.डी. करीत आहेत. २८ हजार ३८० रुपयांची ठेव आणि ९५ हजारांची रोकड हाती असणाऱ्या शमिभा यांचा अर्जही वैध ठरला आहे. यामुळे त्या आजपासून प्रचारात व्यस्त झाल्या आहेत.

# जयंत पाटील यांच्याविरोधात काँग्रेसची निवडणूक आयोगात तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ इस्लामपूर**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याविरोधात सांगलीमध्ये काँग्रेसकडून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे आचारसंहिता भंग केल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहेत.



सांगलीत महाविकास आघाडीत बिघाडी दिसून येत आहे. याचे कारण म्हणजे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याविरोध मविआमधील मित्र पक्ष असलेल्या काँग्रेसने निवडणूक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार दसखल केलीय. आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी ही तक्रार देण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे.

इस्लामपूरमध्ये शरद पवार गटाच्या कार्यालयाच्या मालकी हक्कावरून काँग्रेसकडून ही तक्रार दाखल केली आहे, असं सांगण्यात येत आहे. इस्लामपूरमध्ये शरद पवार गट आणि काँग्रेसमधील कार्यालयाचा वाद आता पुन्हा चव्हाटयावर आला आहे.आता याचप्रकारणी जयंत पाटील यांच्याविरोधात कारवाई कारण्यात यावी, म्हणून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्यात आली आहे.



# बच्चू कडूंच्या रुपाने अचलपुरातून होणार परिवर्तन महाशक्तीचा उदय

## पाचव्यांदा विजयश्री मिळवून देण्यासाठी मतदार सज्ज विरोधी उमेदवारांना बसणार नाराजीचा मोठा फटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अचलपूर**

आपल्या अभिनव व हटके आंदोलनामुळे आणि वेगळ्या कार्यशैलीमुळे संपूर्ण राज्यात प्रसिद्ध असलेल्या बच्चू कडू यांनी अचलपूर विधानसभा या परंपरागत मतदार संघातून पाचव्यांदा रिंगणात उडी घेतली असून परिवर्तन महाशक्तीचा उदय करण्यासाठी सज्ज झालेल्या बच्चू कडू यांच्या मतदार संघाची निवडणूक पुन्हा एकदा चर्चेत आली आहे .अचलपूर या केवळ एका मतदारसंघापूरते मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रातील दिव्यांग, अंध, शेतकरी, शेतमजूर, कामगार आदी वर्गाचे नेतृत्व करून संपूर्ण राज्यात आपले वलय निर्माण करण्यात बच्चू कडू यशस्वी झाले आहे.परिणामी ते संपूर्ण राज्याचे नेतृत्व करीत असून समाजातील खालच्या घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत एक निर्धार केलेल्या बच्चू कडूंनी अचलपूर मतदार संघाच्या निवडणूक रिंगणात तब्बल पाचव्यांदा आपली ताल ठोकली आहे. त्यामुळे संपूर्ण राज्याचे लक्ष या मतदारसंघाच्या निवडणुकीकडे लागले असून बच्चू कडू यांच्या रूपाने परिवर्तन महाशक्तीचा उदय होऊन त्यांचा झेंडा सर्वत्र फडकणार असा दावा राजकीय विश्लेषकांनी केला आहे. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत बच्चू कडू यांचा सामना त्यांचे परंपरागत प्रतिस्पर्धी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या सोबत होत असून भाजपने माळी, बारी, तेली या समाजाची नाराजी ओढवून घेत प्रवीण तायडे सारखा नवखा उमेदवार रिंगणात उतरविला आहे. रिंगणातील इतर उमेदवार केवळ खानापुरती करणारे असून मुख्य लढत बच्चू कडू व बबलू देशमुख यांच्यातच होण्याची शक्यता आहे. बच्चू कडू यांनी लढविलेल्या चार निवडणुकांचे विश्लेषण केल्यास असे लक्षात येईल की बच्चू कडू यांनी कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना एक कार्यकर्ता व रुग्णसेवक म्हणून सर्वसामान्य मतदारांच्या आणि शोषित घटकांच्या बळावर एकहाती लढाई जिंकल्याचे दिसून येते. अचलपूर व चांदूरबाजार अशा दोन तालुक्यात विस्तारलेल्या अचलपूर मतदार संघाची निवडणूक नेहमीच ही जिल्ह्यात केंद्रस्थानी असते. राष्ट्रीय पक्षाच्या उमेदवारासमोर आव्हान निर्माण करणाऱ्या प्रहार जनशक्ती या छोट्या पक्षाचे जाळे आज मात्र संपूर्ण राज्यात पसरले असून या पक्षाचे नेतृत्व करणारे बच्चू कडू यांनी संभाजीराजे छत्रपती व शेतकरी नेते राजू शेट्टी यांच्या मदतीने राज्यात परिवर्तन महाशक्ती गठीत करून शेतकरी, शेतमजूर ,दिव्यांग आणि शोषित घटकातील मतदारांना तिसरा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. राज्यातील परिवर्तनासाठी मतदारांच्या महाशक्तीच्या बळावर रिंगणात उतरलेले बच्चू कडू यावेळी देखील आपली विजयी पताका फडकवतील आणि राज्यात एक वेगळा आदर्श पायंडा पाडतील असा अंदाज राजकीय विश्लेषक वर्तवित आहे .बॉक्स नाराजी पडणार पथ्यावरसंपूर्ण अमरावती जिल्ह्यात केवळ बच्चू कडू हे विजयाची हमी असलेले एकमेव उमेदवार असल्याची चर्चा असून यात भरीसभर म्हणजे मतदार संघातील माळी, बारी, तेली या समाजाची नाराजी बच्चू कडू यांच्या पथ्यावर पडेल अशी परिस्थिती आहे. नेहमी भाजपच्या पाठीशी उभा राहणारा माळी समाज मात्र यावेळी प्रचंड नाराज असून समाजाच्या उमेदवाराला डावलत नवखा व डमी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या उमेदवारास रिंगणात उतरविल्यामुळे त्यांनी टोकाचा निर्णय घेतला आहे. भाजप उमेदवाराला कोणताही परिस्थितीत बळ न देण्याचा निर्धार केलेल्या विविध समाजांच्या नाराजीचा फटका भाजप उमेदवाराला बसणार असून त्याचा मोठा फायदा बच्चू कडू यांना होऊन त्यांच्या मताधिक्यात गतवर्षीपेक्षा मोठी वाढ होईल असा दावा करण्यात येत आहे.

**विकास देणार विजयाची हमी**

जनतेच्या हितासाठी लढणारा आणि दलित, पीडित, शोषित वंचितांचे नेतृत्व करणारा सच्चा नेता म्हणून बच्चू कडू यांची सर्वत्र ख्याती असून गेल्या वीस वर्षात त्यांनी करोडो रुपयांचा निधी आणून केलेला विकासच त्यांच्या विजयाची हमी देणार असे एकंदर चित्र मतदार संघातील आहे. काँग्रेस उमेदवाराप्रति असलेली नाराजी, भाजपने दिलेला डमी उमेदवार व माळी, बारी व तेली समाजाने घेतलेली नकारात्मक भूमिका या सर्व बाबींमुळे बच्चू कडू यांची बाजू भक्कम झालेली दिसून येत असून या निवडणुकीत मोठे मताधिक्य घेत बच्चू कडू यांच्या गळ्यात पाचव्यांदा विजयाची माळ पडेल असा दावा प्रहार कार्यकर्त्यांनी केला आहे. खऱ्या अर्थाने समाजकारण करणारा नेता आणि गोरगरीब जनतेचा आमदार या मतदारसंघाला मिळो अशी भावना मतदारसंघातील मतदारांनी बोलून दाखविली आहे.



# निवडणुकीमुळे पोलिसांची दिवाळी यंदा रस्त्यावरच

## रजा,सुट्यांवर निर्बंध;प्रतिबंधात्मक कारवायांची मोहीम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होताच पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी राज्यातील सर्व पोलिसांना अत्यावश्यक गरजेशिवाय रजा घेऊ नयेत, अशा सूचना दिल्या आहेत. यामुळे पोलिसांना दिवाळीत सुटी घेता येणार नाही.

ऐन दिवाळीत. निवडणुकीचे वातावरण तापणार असल्याने यंदा पोलिसांची दिवाळी रस्त्यावरच जाणार आहे. त्यामुळे हिरमुसल्या चेहऱ्यांनी पोलिसांना कर्तव्य बजावावे लागणार आहे. निवडणूक काळात कायदा सुव्यवस्था राखण्यासह सभा, प्रचार दौरे, मेळावे यासाठी मोठा बंदोबस्त तैनात करावा लागतो. प्रतिबंधात्मक कारवाया करण्यासह निवडणूक कामातही अनेक अधिकारी आणि कर्मचारी गुंतून पडतात. यामुळे मनुष्यबळाची कमतरता जाणवते.

पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असावे, यासाठी निवडणूक काळात अत्यावश्यक गरजेशिवाय कोणीही रजा घेऊ नयेत, असा आदेश पोलिस महासंचालक शुक्ला यांनी काढला आहे. त्यानुसार पोलिस आयुक्त आणि ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी याना सूचना केल्या आहेत.तसेच दीर्घ रजेवर असणाऱ्या पोलिसांनाही हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.सबळ कारण नसल्यास संबंधित गैरहजर पोलिसांवर कारवाया केल्या जात आहेत. त्यामुळे अनेकांनी सुट्टया रद्द करून हिरमुसल्या चेहऱ्याने – ड्यूटीवर हजर राहण्यास प्राधान्य दिले आहे.

मुलांना सुट्ट्या असल्याने गावाकडे जाणे, देवदर्शन किवा पर्यटनाचे बेत आखले जातात. पण विधानसभा निवड– णुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत पोलिसांना रजा मिळणे कठीण आहे. सर्वत्र दिवाळीची धामधूम असताना पोलिस मात्र बंदोबस्तात असणार आहेत. त्यामुळे पोलिसांच्या कुटुंबीयांमध्ये काहीशी नाराजी आहे.

# धामणगाव पंचायत समितीत एक दिवा मतदाराच्या सन्मानासाठी

## जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांच्या पुढाकार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१धामणगाव रेल्वे**

उत्सव लोकशाहीचा सन्मान मतदारांचा.. या थीमवर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्य प्रशासक संजीता महापात्र यांनी पुढाकार घेवून दीपोत्सव करुन मतदार जनजागृती सुरू केली आहे.दरम्यान तालुकास्तरावर एकत्रित येवून मतदारांच्या सन्मानासाठी दीपोत्सवाच्या माध्यमातून मतदार जनजागृती उपक्रम येथील पंचायत समिती कार्यालयात गुरुवारला (ता.३१) राबविण्यात आला.

दिपोत्सवाला सुरूवात झालेली आहे. घरोघरी दिवा लावून दीपावलीचा सण आपण साजरा करीत आहोत. त्याचबरोबर महाराष्टात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूकीची पण सुरुवात झालेली आहे या लोकशाहीच्या उत्सवात मी आपणा सर्वांचे स्वागत करते.अमरावती जिल्हयात स्वीपच्या माध्यमातून मतदार जनजागृतीचे विविध उपक्रम आपण हाती घेतलेले आहेत. मागील लोकसभा निवडणूकीचे वेळी आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून अमरावती जिल्हयाची मतदानाची टक्केवारी वाढली होती. यावेळी सुध्दा सर्वांच मतदारांपर्यंत आपण पोहचवून त्यांना कर्तव्याची जाणीव करुन देणार आहोत.दिवाळीसोबतच आपण लोकशाहीचा उत्सवात एक दिवा मतदाराच्या सन्मानासाठी लावण्यात येत आहे. मतदार संघातील नागरीकांचा सहभाग, महिला आर्थीक विकास महामंडळ,महिला व बालविकास विभाग आणि इतर कार्यालयातील अधिकारी कर्मचा–यांना एकत्र येवून एक लाख कुटूंबापर्यत मतदार जनजागृतीचा संदेश घेवून जाण्याचा संकल्प केलेला आहे.

लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास, विकासाला गती येण्यास भरीव मदत होते.याच दृष्टीकोनातून या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावणे नितांत गरजेचे आहे.किंबहूना मतदानाचा हक्क बजावणे म्हणजे राष्ट्रीय कर्तव्य बजावणे आहे.एक सुज्ञ मतदार या नात्याने मतदानाच्या दिवशी आपला मतदानाचा हक्क बजवावा.

**संजय पाटील,गटविकास अधिकारी धामणगाव रेल्वे**

उत्सव लोकशाहीचा सन्मान मतदारांचा.. या थीमवर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा मुख्य प्रशासक संजीता महापात्र यांनी पुढाकार घेवून दीपोत्सव करुन मतदार जनजागृती सुरू केली आहे.

दरम्यान तालुकास्तरावर एकत्रित येवून मतदारांच्या सन्मानासाठी दीपोत्सवाच्या माध्यमातून मतदार जनजागृती उपक्रम येथील पंचायत समिती कार्यालयात राबविण्यात आला.यावेळी गटविकास अधिकारी संजय पाटील,सहाय्यक गटविकास अधिकारी मीना मस्तकर,बाल विकास प्रकल्प अधिकारी गायत्री चव्हाण, गटशिक्षणाधिकारी सपना भोगावकर, सहायक प्रशासन अधिकारी प्रशांत जोशी,कनिष्ठ प्रशासन अधिकारी संजय गुल्हाने,गजानन सांगळे सहाय्यक लेखाधिकारी अमोल गोफने,कृषी अधिकारी राजू सावळे, कृषी विस्तार अधिकारी शुभम खंडेझोड,विस्तार अधिकारी सांखिकी सचिन मिसाळ,आरोग्य विस्तार अधिकारी संजय गव्हाणे,कनिष्ठ लेखाधिकारी प्रणव कापकर,कनिष्ठ अभियंता प्रवीण आखरे,अभिजीत कल्ले,स्थापत्य अभियांत्रिकी सहायक शशांक जारी, अजिंक्य खेर्डे, मनीष बनपट्टे,वरिष्ठ सहाय्यक प्रकाश महात्मे,गजेंद्र काळे, दिनकर काष्टे,संजय चव्हाण, सचिन गायकी,अजय सोनकुसरे,दुर्योधन चव्हाण,अमोल कावरे,विजय जीरापुरे,पंकज यादव,मंगेश राऊत,लखन चव्हाण,संतोष वानखडे ,प्रशांत मनवर,विस्तार अधिकारी सांख्यिकी गोपाळ वानखेडे,मोबीन खान,सोनाली कडू,अश्विनी सुलताने, मीनल पाटील,सुशिला राठोड,ऋतुजा हुमणे तसेच प्रेमकुमार अंबुलकर विशाल सुटे,रवींद्र देशमुख, बंडू वैरागडे राजू पांडे,हेमलता परमार,राजू पवार व आदी उपस्थित होते.तसेच संदीप गजभिये,अजय सरदार,अमित ढवळे,आशिष कळसकर, विवेक महागावकर,श्री काळपांडे,स्नेहल सोनटक्के ,हितेश वाघाडे व आदी उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या हिवाळी-२०२४ च्या पुढे ढकलण्यात आलेल्या परीक्षा ३० नोव्हेंबर पासून होणार : सुधारित वेळापत्रक जाहीर : संबंधितांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**




संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी २०२४ च्या दुस–या टप्प्यातील दि. ११ नोव्हेंबर, २०२४ पासून सुरू होणा–या परीक्षा काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आल्या होत्या, मात्र सदर परीक्षा हा दि. ३० नोव्हेंबर, २०२४ पासून सुरू होणार असून सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. यासंदर्भात परीक्षा विभागाकडून सर्व संलग्नित महाविद्यालये, प्राचार्य, केंद्राधिकारी, परीक्षा केंद्रांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून याची सर्वसंबंधित विद्यार्थी व महाविद्यालयांनी नोंद घ्यावयाची आहे. महाविद्यालयांनी आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत याची माहिती पाठवावी. तसेच काही अडचण असल्यास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक संचालक डॉ. नितीन कोळी यांचेशी ९८५००४२३५७ मो. क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# महालक्ष्मी योगात साजरी होईल दिवाळी:१ नोव्हेंबरला पूजेसाठी ६ शुभ मुहूर्त

## जाणून घ्या लक्ष्मी पूजेचे साहित्य, कुबेर आणि तिजोरी पूजेची पद्धत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि३१अमरावती**



अमावस्या ३१ ऑक्टोबरला दुपारी ४ नंतर सुरू होईल आणि १ नोव्हेंबरला संध्याकाळपर्यंत चालेल. त्यामुळे देशातील बहुतांश ठिकाणी १ नोव्हेंबरला रोजी दिवाळी साजरी केली जाणार आहे. अनेक योगही या दिवशी तयार होत आहेत, जे लक्ष्मीची पूजा करण्यासाठी आणि नवीन कामांची सुरुवात करण्यासाठी शुभ ठरतील.

पंडितांचा असा विश्वास आहे की दिवाळीला संध्याकाळी ४ राजयोग तयार होतील ज्यामुळे समृद्धी मिळेल. शश, कुलदीपक, शंख आणि लक्ष्मी योग तयार झाल्याने या महान उत्सवाचे शुभ परिणाम आणखी वाढतील.

# विदर्भ प्रजासत्ताक

विधानसभा निवडणूक कुरुक्षेत्र २०२४

५ गुरुवार दि. ३१ ऑक्टोंबर २०२४




# ईव्हीएमवर नजर ठेवणार 'जीपीएस'मतदान यंत्राची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर बसविणार यंत्रणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

विधानसभेसाठी २० नोव्हेंबररोजी मतदान होणार आहे. त्यासाठी वापरण्यात येणारे मतदान यंत्र अर्थात ईव्हीएमवर करडी नजर ठेवण्यासाठी यंत्र वाहतूक करणाऱ्या वाहनांना जीपीएस (ग्लोबल पोजिशनिंग सिस्टीम) बसवण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात



येणार आहे.

निवडणूक यंत्रणेत यापूर्वी जीपीएस प्रणालीचा वापर केला जात नव्हता, तो यंदा लोकसभा निवडणुकीपासून केला जात आहे. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना आता थेट नियंत्रण ठेवता येणे शक्य झाले आहे. एसटी महामंडळाकडील सुसज्ज बसेस याकर्मचाऱ्यांसाठी घेतल्या जाणार आहेत.जिल्हा प्रशासनाकडून एक स्वतंत्र जीपीएस बसविले जाणार आहे. रस्त्यात जाताना किंवा येताना बस बंद झाली किंवा मशीनमध्ये बिघाड झाला तर यामुळे अनुचित प्रकार टाळता येणे सहज शक्य होणार आहे. जीपीएसमुळे तत्काळ मदत होते. याचा फायदा प्रशासनाला होणार असल्याचे सांगण्यात आले.

**कंट्रोल रूम तयार होणार**

जीपीएससाठी स्वतंत्र कंट्रोल रूम तयार केले जाणार आहे. कंट्रोल रूमचा कंट्रोल कुणाकडे दिला जाणार, याबाबतच्या नियोजनासाठी जिल्हा प्रशासन, पोलिस व आरटीओ यांची बैठक होणार आहे. यामध्ये बसची संख्या, जीपीएस व कंट्रोल रूम यावर शिक्कामोर्तब होईल, अशी माहिती आहे.

# मावशी, काका, काकू लक्ष असू द्या बरं मतदारांचा घेतला जातोय कानोसा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

लोकसभा निवडणुकीत जेवढी धामधूम नव्हती, त्यापेक्षा अधिकची धामधूम विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळत आहे. यावेळी नातेवाइक अर्धे तिकडे, अर्धे इकडे असल्याचे बघायला मिळत आहे. त्यामुळे उमेदवारांची मतांसाठी ओढाताण अधिकच होऊ लागली आहे. 'अहो, मी आपलाच आहे,' असे म्हणून सर्वच उमेदवार गयावया करत आहेत. लोकसभा निवडणुकीत निष्ठावान पदाधिकारी व कार्यकर्त्यांना जास्त फिरावे लागले नाही. पण, विधानसभा निवडणुकीत तारांबळ उडत आहे.

निष्ठावान पदाधिकारी, कार्यकर्ते विधानसभा निवडणुकीत धावपळ करू लागले, त्याचे कारणही वेगळे आहे. विधानसभा निवडणुकीत विचार झाला नाही तर काही हरकत नाही. पुढे होणाऱ्या




जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपंचायत, नगर परिषद, ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत आपला विचार होईल, अशी आशा काही जण ठेवून आहेत. त्यामुळे तर कोणकोणत्या गावात नातेवाइक आहेत, याचा शोध घेऊन प्रचार सुरू करण्यात आला आहे. यासाठी आपल्या उमेदवारांचे नातेवाइक जास्त कोणत्या गावात आहेत, याचा शोध घेऊन त्या नावाला टीक मार्क करीत आहेत.

साथ देण्याची वेळनिवडणुकीच्या निमित्ताने मित्र आठवू लागले आहेत. तुम्ही आहात म्हणून तर मी निवडणूक लढवत आहे. तुमचे सहकार्य जरूर मिळेल. यात दुमत नाही. पण, आता मत-दारसंघात फिरण्यासाठी आणि मतदारांची भेट घेण्यासाठी तुमची साथ हवी, अशी विनंती उमेदवार करू लागले आहेत.

**निवडणूक साहित्याची मागणी वाढली**

निवडणूक आली की, राजकीय पक्षांचे पोस्टर्स, डिजिटल बॅनर्स, झेंडे, मफलर, टोपी आदी वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे साहित्य यांची मागणी वाढत असते. पक्षांचे व्होटर स्लिप, हँडबिल्स, स्टिकर्स, पोस्टर्स, अहवाल पुस्तिका, डमी व्होटिंग मशिन, डिजिटल बॅनर्स, टोपी, झेंडे, पट्टा रोल, हँडबँड आदी साहित्य यांची मागणी वाढली आहे.

# अचलपूर मतदार संघात कॉंग्रेसला मोठा धक्का : करजगाव येथील बशीर कुरेशी यांचा प्रहारमध्ये प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३२अचलपूर**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कॉंग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला असून करजगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व मुस्लिम समाजातील एक प्रतिष्ठित व्यक्तिमत्व बशीरभाऊ कुरेशी यांनी प्रहार जनशक्ती पक्षात प्रवेश केला.अचलपूर विधानसभा मतदारसंघात मुस्लिम समाज हा कॉंग्रेसची वोट बँक असून कॉंग्रेस नेत्यांच्या कार्यशैलीमुळे मुस्लिम समाज नाराज आहे. परिणामी कॉंग्रेस मधील मुस्लिम समाज नेते व पदाधिकारी कॉंग्रेसला हात दाखवीत इतर पक्षात सहभागी होत असल्याने कॉंग्रेसला धक्के बसत आहे. या निवडणुकीच्या धामधुमीत करजगाव येथील सामाजिक कार्यकर्ते व बहुआयामी व्यक्तिमत्व बशीर भाऊ कुरेशी यांनी कॉंग्रेस सोडून बच्चू कडू यांच्या उपस्थितीत प्रहार जनशक्ती पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी प्रहारचे संस्थापक बच्चू कडू यांनी बशीर कुरेशी यांचे पक्षात स्वागत करून त्यांचे अभिनंदन केले.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी सुविधांचा आढावा

## आवश्यक सुधारणांबाबत यंत्रणेला सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी बुधवारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे पाहणी व निरीक्षण दौरा केला. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन), जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन), शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची प्रशासकीय इमारत, मुलींचे वसतिगृह, मुलांचे वसतिगृह, ग्रंथालय, व्याख्यानगृह इत्यादींची प्रत्यक्ष पाहणी केली.दौऱ्यादरम्यान शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत आढावा घेतला. जिल्हाधिकारी यांनी इर्विन व डफरीन येथील वैद्यकीय महाविद्यालयांशी संबंधित ऑपरेशन थिएटर, स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र कक्ष, इर्विन येथे नवीन तयार होणारे हृदयरोग अतिदक्षता विभाग या



इमारतींना भेट देऊन आवश्यक सुधारणा करण्याबाबत मार्गदर्शन केले.

डफरीन रुग्णालय येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या शैक्षणिक इमारत, व्याख्यानकक्ष, ग्रंथालय, वसतिगृहे इत्यादी ठिकाणी भेट देऊन तेथे उपलब्ध असलेल्या सोयी सुविधांबाबत आढावा घेतला. जिल्हाधिकाऱ्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास आवश्यक असलेल्या बाबींचा पुरवठा करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना तसेच इतर उपलब्धनिधीतून आवश्यक बाबी उपलब्ध करून देण्यात येईल, असे सांगितले. अमरावती येथे सुसज्ज कम्प्युटराइज व्याख्यान कक्ष, मायनर ओटी येथील सुरक्षा व्यवस्थेचाही आढावा घेतला. नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविणे हे प्रथम प्राधान्य असावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीपसौंदळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गिरी, उपअभियंता बांधकाम विभाग काळे, आरोग्य विभागाचे उपअधिष्ठाता डॉ. नितीन अंभोरे, प्रशासकीय अधिकारी संजय मैदानकर, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, जिल्हा स्त्री रुग्णालय डफरीन वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार आदी यावेळी उपस्थित होते.

# रॅलीत गर्दी कुणाची अधिक, सोशल मीडियावर घमासान कोण एक नंबरवर : दिवाळीत शाब्दिक फटाके फुटू लागले

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

मंगळवारपर्यंत नामांकन झाल्यानंतर उमेदवारांच्या रैलीत कुणाची गर्दी अधिक होती, कोण एक नंबरवर होता. याबाबत सोशल मीडियावर आतशबाजी होत आहे. अमरावती जिल्ह्यात विधानसभेच्या निवडणुकीत नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतिम दिवशी अनेक उमेदवारांनी नामांकन दाखल केले. नामांकन दाखल झाल्यानंतर सोशल मीडियावर आमच्याच भाऊंच्या रैलीमध्ये गर्दी अधिक होती, याबाबत पैज लागली आहे. तसेच रैली काढण्यासाठी कार्यकर्त्यांना आणण्यासाठी कोणकोणत्या उमेदवारांनी पैसे दिले, याचीही सोशल मीडियावर चर्चा होत आहे.



एका भाऊंचे कार्यकर्ते म्हणतात, आम्ही कार्यकत्यांना एकही रुपया दिला नाही, सर्व कार्यकर्ते आपापल्या वाहनाने रॅलीत सहभागी होण्यासाठीआले. दुसऱ्या भाऊंनी मात्र हजारौ गाड्यांच्या वापर करून कार्यकत्यांना पैसा देऊन गर्दी जमवली. भाऊ भाऊंच्या गर्दीवरून सोशल मीडियावर दिवाळीत शाब्दिक फटाके फुटत आहेत.

आमचाच भाऊ नंबर वन, कोण दोन नंबर, त्यानंतर रैलीत कार्यकर्त्यांची गर्दी करण्यात कोण भाऊ तीन नंबरवर याचीही चर्चा सोशल मीडिया होत आहे. शिवाय गावागावात भाऊंच्या रैलीची गर्दी व खानावळीची चर्चा मोठ्या चवीने होऊ लागली आहे काही कार्यकर्त्यांनी तर आपली हौस फिटवण्यासाठी त्याही भाऊंच्या रैलीत अन दुसऱ्या दिवशी याही भाऊच्या रॅलीत सहभागी झाल्याचे अनेकांनी सांगितले.

एकाने चाय, पाणी, जेवण, नाष्टा अशी सोय अनेक ठिकाणी केली होती. त्यामुळे कार्यकर्त्यांना कोणताही आटापिटा करावा लागला नव्हता. अन्य एका रैलीमध्ये पाणी, जेवणाची अव्यवस्था होती, असे रैलीसाठी गेलेलेकार्यकर्ते गावात येऊन सांगत होते.दोन- तीन भाऊंच्या नामांकनाच्या वेळी ढोल ताशे वाजवून, डीजेच्या तालावर नाचणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपली हौस निवडणूक निकालापूर्वीच फुक्टात भागवून घेतली.

कार्यकर्त्यांच्या गर्दीवरून कोण निवडून येणार, याचाही अंदाज कार्यकर्त्यांनी बांधला आहे. भाऊंच्या नामनिर्देशन दाखल करण्याच्या रॅलीत असलेली असंख्य गर्दी मतदानात परावर्तीत होईल काय, याचा अंदाज बांधणे आज तरी कठीण आहे. भाऊंनी आपली शक्तीदाखवण्यासाठी कार्यकर्त्यांच्या रॅलीसाठी गावागावात चार चाकी गाड्या पाठवून लोकांची गर्दी जमवली, हे मात्र कोणालाही नाकारता येणार नाही. खरा रणसंग्राम पाच तारखेनंतर सुरू होणार आहे. यात प्रचाराचा धुराळा उडणार आहे.

# फटाके, थंडीमुळे वाढतो श्वसन विकार

## 'अस्थमा', 'सीओपीडी' रुग्णांना वाढतो त्रास..



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

वातावरणातील बदल,वाढणारी थंडी, फटाके व अन्य वायू प्रदूषणामुळे श्वसनविकाराचा धोका वाढतो. 'अस्थमा', 'सीओपीडी' व अन्य फुफ्फुस विकारांच्या रुग्णांना याचा मोठा त्रास होतो. या दिवसांमध्ये श्वसन विकाराच्या रुग्णांनी योग्य काळजी घेण्याचे व लक्षणे वाढताच तातडीने डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. दिवाळी हा भारतातील महत्त्वाचा सण असला तरी दम्याचा त्रास असलेल्यांसाठी तो अनेकवेळा घातक ठरू शकतो. दमा ही फुफ्फुसांच्या जळजळीमुळे उद्भवणारी आणि श्वसननलिकेतील टोकांच्या संवेदनशीलतेवर परिणाम करणारी स्थिती आहे.

अस्थमामध्ये वायू मार्गातील श्वसननलिका फुगून बाहेरील हवेचा प्रवाह प्रतिबंधित होतो. परिणामी, श्वास लागणे, घरघर येणे आणि छातीत घट्टपणा, आदी प्राथमिक लक्षणे दिसून येतात. फटाक्यांमुळे वाढणारे कण, उत्सर्जन आणि वायू प्रदूषणामुळे अस्थमाचा त्रास आणखी वाढण्याची शक्यता असते.

**घरांमध्येच राहा**

फटाक्यांमधून निघणाऱ्या धुरात सल्फर डाय ऑक्साइड, कार्बन मोनोऑक्साइड, नायट्रस ऑक्साइड आणि अन्य विषारी वायू असतात. त्यामुळे प्रदूषण वाढते. सर्दी-खोकला, दमा, सीओपीडी, इंटरस्टेशियल लंग्स डिसिजची शक्यता वाढते. ज्यांना गंभीर स्वरूपातील कोविड होऊन गेलाय अशा रुग्णांनी या धुरापासून दूर राहावे. स्वतःचे संरक्षण करण्यासाठी शक्यतो घराबाहेर पडणे टाळायला हवे.

**इन्हेलर सोबत ठेवा**

इन्हेलर थेट वायू मार्गावर लक्ष्यीत उपचार आहे. त्यामुळे दम्याचा झटका येण्याची शक्यता कमी होऊ शकते. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार इन्हेलरचा डोस घ्यायला हवा. स्वतःहून ते बंद करू नये. दिवाळीच्या वेळी अनेक वायूजन्य ट्रिगर्स असल्याने, तुमचे रिलिव्हर इन्हेलर हातात ठेवणे चांगले.

# २५ उमेदवारांचे ४१ अर्ज बाद; रिंगणात २४८ उमेदवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

जिल्ह्यात आठ विधानसभा मतदारसंघांत बुधवारी झालेल्या अर्ज छाननीमध्ये २५ उमेदवारांचे ४१ अर्ज बाद झाले आहेत. त्यामुळे रिंगणात सध्या २४८ उमेदवार आहेत. ४ नोव्हेंबरला उमेदवारी अर्जाची माघार झाल्यानंतर आठही विधानसभा मतदारसंघांतील निवडणुकीचे चित्रस्पष्ट होणार आहे.अमरावती, अचलपूर, तिवसा व धामणगाव मतदारसंघात सर्व उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. तर बडनेरा विधानसभा



मतदारसंघात ७ उमेदवारांचे ११ अर्ज, दर्यापूर मतदारसंघात ११ उमेदवारांचे २० अर्ज, मेळघाटात ४ उमेदवारांचे ६ अर्ज व मोर्शी विधानसभा मतदारसंघात ३ उमेदवारांचे ४ अर्ज विविध कारणांनी बाद ठरले आहेत. बाद झालेले अर्ज अपक्ष उमेदवारांचे असल्याचे निवडणूक विभागाने सांगितले. सध्या धामणगाव मतदारसंघात २८, बडनेरा ४०, अमरावती २९, तिवसा ३६, दर्यापूर ३२, मेळघाट २४, अचलपूर ३० व मोर्शी मतदारसंघात २९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत.

निवडणूक कार्यक्रमानुसार ४ नोव्हेंबरला दुपारी ३ पर्यंत उमेदवारी अर्जाची माघार घेता येते. त्यानंतर अंतिम उमेदवारांची यादी प्रत्येक मतदारसंघात जाहीर करण्यात येणार आहे व त्यानंतर राखीव चिन्हांव्यतिरिक्त मुक्त निवडणूक वारांना चिन्हांचे वाटप अन्य उमेदवारांना होणार आहे.बॉक्सतर अर्ज होतो बादअर्जावर सही नाही, सूचक पुरेसे नाहीत, मतदारसंघात उमेदवाराचे नाव नाही, शपथ घेतलेली नाही, यादीमधील क्रमांकावर त्यांचे नाव नाही, दिवाळखोर घोषित केलेला आहे, निवडणूक लढविण्यास अनर्ह आहे. असे उमेदवारी अर्ज छाननीमध्ये बाद होतात.